# हिंगोली जिल्हा पोलीस

मा. मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांचे
१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम

सादरकर्ता:
श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, हिंगोली.

# हिंगोली जिल्हा पोलिस दलाकडून राबविण्यात आलेले उपक्रम

- संकेतस्थळ
- सुकर जीवनमान
- स्वच्छता
- तक्रार निवारण
- कार्यालयीन सोई सुविधा
- क्षेत्रीय कार्यालय भेटी
- ई – ऑफीस प्रणाली


- आर्थिक व औदयोगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन
- अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर
- नाविन्यपुर्ण उपक्रम

# १. संकेतस्थळ

- वेबसाइट वापरण्यासाठी सुलभ आणि युजर–फ्रेंडली आहे. यामध्ये सोपी नेव्हिगेशन, स्पष्ट मेन्यू आहे. संकेतस्थळ : **https://hingolipolice.gov.in/**
- पोलिस विभागाशी संबंधित सर्व माहिती अद्यावत करण्यात आली आहे.नागरिकांना आवश्यक असलेल्या सेवा, तक्रार नोंदणी प्रक्रिया, आपत्कालीन क्रमांक, वरिष्ठ अधिकाऱ्यांची संपर्क क्रमांक आणि विविध योजना याबाबत अद्ययावत माहिती उपलब्ध आहे. तसेच, गुन्हेगारी प्रतिबंध, सुरक्षा उपाय, आणि जनजागृती कार्यक्रमांची माहिती वेळोवेळी अपडेट केली जाते.
- माहिती अधिकारी अधिनियम (**RTI**) अंतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण हिंगोली पोलिस दलाच्या वेबसाइटवर करण्यात आले आहे.
- वेबसाइटचा डाटा सायबर सुरक्षित आहे. **Security Boat** या नामांकित सायबर सुरक्षा कंपनीकडून वेबसाइटची सखोल तपासणी आणि सुरक्षा अद्ययावत करण्यात आली आहे. त्यांनी वेबसाइटला **Safe to Host** प्रमाणपत्र दिले आहे, ज्यामुळे डेटा एन्क्रिप्शन, फायरवॉल, आणि मल्टी–लेयर सुरक्षा उपाय लागू करण्यात आले आहेत.
- लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सेवा अधिसूचित करून हिंगोली पोलिस दलाच्या वेबसाइटवर ऑनलाइन प्रसिद्ध केल्या आहेत. नागरिकांना विविध सेवांचा लाभ मिळावा यासाठी तक्रार नोंदणी, पात्रता प्रमाणपत्र, पोलीस व्हेरिफिकेशन, शस्त्र परवाना, तसेच इतर प्रशासकीय सेवांची माहिती ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. सेवा देण्याची प्रक्रिया, कालावधी, आवश्यक कागदपत्रे, आणि शुल्क याबाबत सविस्तर माहिती दिली आहे.

# संकेतस्थळ फोटो

संकतस्थळाचा पुर्वीचा फोटो







अदयावत फोटो

# २.सुकर जीवनमान

## सेवा क्रमांक – १ Police Application Tracker

हिंगोली पोलिस दलाने सुकर जीवनमान करण्यासाठी विशेष उपक्रम म्हणून **Police Application Tracker** सुरू केला आहे. या ट्रॅकरद्वारे नागरिकांना विविध पोलीस सेवांचा ऑनलाइन मागोवा घेता येतो. अर्ज सादर केल्यावर त्याची स्थिती, प्रगती, आणि अंतिम निकाल यांची माहिति ट्रॅकरच्या माध्यमातून मिळते. यामुळे तक्रारींचे निराकरण जलद आणि पारदर्शक पद्धतीने होते.

**Police Application Tracker** वापरल्याने नागरिकांना थेट पोलीस ठाण्यात न जाता ऑनलाईनच सेवा मिळते, ज्यामुळे वेळ, श्रम, आणि तक्रार प्रक्रियेतील त्रास कमी होतो. या उपक्रमात SMS अलर्ट सुविधा देखील उपलब्ध आहे. अर्ज सादर करताच प्राप्तीचा SMS, प्रक्रियेतील प्रगती, आणि अंतिम निकाल याची माहिती अर्जदाराला SMS द्वारे तत्काळ मिळते.

### Police Application Tracker ची वैशिष्ट्ये

१. अर्जदाराला अर्जाची स्थिती: अर्ज सादर करताच अर्जदाराला प्राप्तीचा SMS मिळतो.

२. प्रगतीबद्दल माहिती: अर्जाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रक्रियेची स्थिती SMS द्वारे कळवली जाते.

२. अंतिम निर्णयाची माहिती: अर्जाचा निर्णय (मंजुरी/नकार) झाल्यावर अर्जदाराला अंतिम स्थितीचा SMS दिला जातो.

४. अधिकृत संकेतस्थळ : **https://hingoli.districtpolice.in/**

# २. सुकर जीवनमान

## सेवा क्रमांक – २. घटना नोंद वही (Police Occurrence Register)


हिंगोली पोलिस दलाने सुकर जीवनमान या उपक्रमांतर्गत सर्व पोलिस चौकयांमध्ये पोलिस ऑक्युरन्स रजिस्टर अद्ययावत करून उपलब्ध करून दिले आहे. यामुळे आपत्ती, गुन्हेगारी, अपघात व इतर घटनांची नोंद अचूकपणे आणि तत्काळ घेणे शक्य होते.

**Police Occurrence Register मुळे नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा:**

१.घटनांची तत्काळ नोंदणी: कोणतीही घटना घडल्यास ती त्वरित पोलीस चौकीमध्ये नोंदविली जाते.

२.वेळेची बचत: नागरिकांना त्यांची तक्रार वेळेत पोलीसांपर्यंत पोहचविण्यास मदत होते.

## फोटो



# ३. स्वच्छता

- हिंगोली पोलीस अधीक्षक कार्यालय मध्ये ८१५० फाईलांचे निंदनिकरण व वर्गीकरण पूर्ण केले आहे.
- हिंगोली पोलिस दलाने कालबाह्य अभिलेख नष्ट करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. या प्रक्रियेअंतर्गत एकूण ३२७० कालबाह्य फाईल्स नियमानुसार नष्ट करण्यात आल्या आहेत.
- हिंगोली पोलीस अधीक्षक कार्यालय येथे अवजड वस्तूंची नोंदवही अद्ययावत करण्यात आलेली आहे.
- अवजड वस्तू नोंदणी प्रक्रियेनुसार, एकूण ११४६ कालबाह्य अवजड वस्तूंची नोंदणी करण्यात आली आहे. यापैकी ११०८ अवजड वस्तू निरुपयोगी असल्याने प्रक्रियेप्रमाणे विल्हेवाट लावण्यात आल्या आहेत.
- हिंगोली पोलिस दलाने जुन्या वाहनांचे निर्लेखन करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. या संदर्भात ADG, MT पुणे यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. एकूण ०६ वाहने निर्लेखनासाठी निवडण्यात आली आहेत, ज्यामध्ये ०४ जीप आणि ०२ दुचाकी वाहनांचा समावेश आहे.

# स्वच्छता फोटो

पुर्वीचा फोटो





अदयावत फोटो

# ४. तक्रार निवारण

- हिंगोली पोलीस दलाने आपले सरकार पोर्टलवरील दिनांक ०१ जानेवारी २०२५ पुर्वीचे एकुण ११८ तक्रारी अर्ज निकाली काढले असुन ०१ जानेवारी २०२५ पासुन १५ एप्रिल २०२५ पर्यंत एकुण २४ तक्रारी अर्ज निकाली काढुन तक्रारी अर्ज निरंक केले आहे.
- हिंगोली पोलीस दलाने पी.जी. पोर्टलवरील दिनांक ०१ जानेवारी २०२५ पुर्वीचे एकुण १० तक्रारी अर्ज निकाली काढले असुन ०१ जानेवारी २०२५ पासुन १५ एप्रिल २०२५ पर्यंत एकुण ०६ तक्रारी अर्ज निकाली काढुन तक्रारी अर्ज निरंक केले आहे.
- पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिध्दी फलक लावण्यात आले आहे.
- हिंगोली पोलीस दलाने प्रत्येक शनिवारी नागरीकांकरीता तक्रार निवारण दिन आयोजीत करून मा. पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांनी एकुण ३२ तक्रारीचे अनुषंगाने ०३ तक्रारी मध्ये गुन्हा नोंद, १२ तक्रारीमध्ये अदखलपात्र गुन्हा नोंद, ०८ तक्रारीचे अनुषंगाने प्रतिबंधत्मक कारवाई तसेच ०९ तक्रारी फाईल करण्यात आल्या.

# ५. कार्यालयीन सोई सुविधा

- हिंगोली पोलीस अधीक्षक कार्यालय येथे स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. सर्व ठिकाणी आधुनिक वॉटर प्युरिफायर व फिल्ट्रेशन सिस्टम बसवण्यात आले आहेत, जेणेकरून सर्व अधिकारी, अंमलदार तसेच नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित पाणी उपलब्ध होईल.स्वच्छ पाण्याच्या व्यवस्थेची नियमित देखरेख वरिष्ठ अधिकारी यांच्याद्वारे दररोज केली जाते.
- कर्मचारी आणि अभ्यागतांसाठी स्वच्छ आणि सुसज्ज प्रसाधनगृहांची व्यवस्था केली आहे. पुरुषांसाठी आणि महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी नियमित साफसफाई दररोज केली जाते तसेच नियमित देखरेख वरिष्ठ अधिकारी यांच्याद्वारे केली जाते.
- अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतीक्षालयांची निर्मिती करण्यात आली आहे, जेथे बैठक व्यवस्था, पाण्याची सुविधा, आणि माहिती फलक उपलब्ध आहेत. यामुळे अभ्यागतांना आरामदायी व अनुकूल वातावरण मिळते.

# ५. कार्यालयीन सोई सुविधा

- कार्यालयामध्ये सर्व विभाग, कार्यालये आणि कक्षांची ओळख पटवण्यासाठी सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. यामुळे नागरिकांना आवश्यक कार्यालये सहज सापडतात व कामकाज अधिक सुलभ होते.
- कार्यालयाच्या परिसराचे सौंदर्यीकरण करताना वृक्षारोपणावर विशेष भर देण्यात आला आहे. कार्यालयाच्या परिसरात विविध प्रकारची वृक्ष आणि फुलझाडे लावण्यात आली आहेत.पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची सुविधा, सुसज्ज प्रतीक्षालय, आणि व्यवस्थित दिशादर्शक फलक यामुळे नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित व सौंदर्यपूर्ण वातावरण उपलब्ध होते. हिंगोली पोलिस दलाने या उपक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धनासोबतच कार्यालयाची आकर्षकता वाढवली आहे.

# कार्यालयीन सोई सुविधा फोटो

स्वच्छ पिण्याचे पाणी




स्वतंत्र प्रसाधन गृह




# कार्यालयीन सोई सुविधा फोटो

## अभ्यागत कक्ष पुर्वी



## अभ्यागत कक्ष सध्यस्थिती



# कार्यालयीन सोई सुविधा फोटो

## दिशादर्शक फलक




## कक्ष नाव फलक







## भेटीचे फलक



# कार्यालयीन सोई सुविधा फोटो

## कार्यालय परीसर सौंदर्यीकरण







# ६. क्षेत्रिय कार्यालयांना भेटी

- पोलीस अधिक्षक यांनी ५८ वेळा व अपर पोलीस अधीक्षक यांनी ४६ अशा एकुण १०४ वेळा उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पोलीस स्टेशन व पोलीस मदत केंद्रांना भेटी दिल्या आहेत.





फोटो





# ७. ई – ऑफीस प्रणाली

- १०० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत ई–ऑफिस प्रणालीचा वापर सुरू करण्यात आला आहे.
- सदर ई ऑफीस प्रणालीमध्ये सर्व पोलीस स्टेशन/शाखा प्रभारी अधिकारी, अंमलदार सर्व लिपीकवर्ग यांचे ई ऑफिस तयार करून रोल मॅपिगं तयार करून ई ऑफीस प्रणाली चार स्तरांवर सुरू करण्यात आली आहे.

# ८. आर्थिक व औदयोगिक गुतंवणूकीस प्रोत्साहन

- हिंगोली पोलीस दलाने गुंतवणूकदार व उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात कायदा व सुव्यस्था अबाधीत ठेवुन पोषक वातावरण निर्माण केले आहे.
- व्यापारी व कामगार वर्गाच्या संघटनांशी एकुण ०२ बैठका घेवुन त्यांचे सोबत चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविल्या आहे.
- तसेच गुंतवणूकदार व उद्योजकांच्या ०२ बैठकांचे आयोजन करून त्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यात आले आहे.
- टोकाई सहकारी साखर कारखाना गाळप चालु असतांना कारखाण्याचे कामगार यांनी त्यांचे उर्वरीत रक्कम मिळावी यासाठी कारखाना परीसरात उपोषनास बसले होते व वाहनांची अडवणुक करून काम बंद आंदोलन करत होते.त्याठिकाणी तात्काळ स्थानिक पोलीस स्टेशनचे अधिकारी व स्टाफ यांना पाठवुन योग्य ती मदत करुन कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होवु दिला नाही.

# आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकदार बैठक फोटो









# ९. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- नव्याने सेवेत प्रविष्ठ अधिकारी व अंमलदार यांना पोलीस दलामार्फत वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते. पोलीस अधीक्षक कार्यालय येथे अधिकारी यांचे करिता सेमीनार तसेच उजळणी कोर्सच्या माध्यमातुन पोलीस अंमलदार यांना नविन फौजदारी कायदे, मैदानी चाचणी तसेच परेडचे प्रशिक्षण देण्यात येते.
- १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत, हिंगोली पोलिस दलाने नियमांनुसार एकूण १५ कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली आहे. या प्रक्रियेअंतर्गत पात्रता, कार्यक्षमता, आणि नियमांनुसार मूल्यांकन करण्यात आले.
- पोलीस अधीक्षक कार्यालय येथे अधिकारी व अंमलदार यांचे करिता कार्यशाळेचे आयोजन करून **AI** कृत्रीम बृध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरासंबधी मार्गदर्शन केले ज्यामध्ये **Chatgpt, Gemini** अशा **Open AI** चा वापर कामकाजामध्ये करून **Administration** व कार्यक्षमता वाढवावी याबाबत मार्गदर्शन केले..
- सायबर सेल येथे **Chatgpt** या ओपन एआय चा दैनंदीन कामात वापर करण्यात येत आहे.

# ९. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

हिंगोली पोलिस दलातील सर्व तपासी अधिकारी व अंमलदार यांना **eSakshya App** वापरण्याचे प्रशिक्षण दिले आहे. त्याचा दैनंदिन कामकाजामध्ये वापर होत आहे.

**eSakshya App** चे पुढील फायदे होत आहेत:

- गुन्ह्याची चौकशी अधिक प्रभावी व डिजिटल स्वरूपात होत आहे.
- तपास प्रक्रियेत पारदर्शकता व गती वाढली आहे.
- महत्वाच्या पुराव्यांचे संकलन व नोंद डिजिटल माध्यमातून सुरक्षितपणे होत आहे.
- कोर्टात सादर करण्यासाठी आवश्यक पुरावे एकत्र ठेवणे सुलभ झाले आहे.

**i-Got Karmayogi App -**

हिंगोली जिल्ह्यातील अधिकारी व अमलदार **i-Got Karmayogi App** डाउनलोड करून त्याद्वारे विविध विषयांवरील डिजिटल ऑनलाईन प्रशिक्षण घेत आहेत. त्यामुळे त्यांचे प्रशासनिक ज्ञान, कौशल्य व कार्यक्षमता वाढण्यास मदत होत आहे.

- सर्व अधिकारी व अमलदारांना नवीन फौजदारी कायद्यांचे प्रशिक्षण कार्यशाळा घेऊन देण्यात आले आहे.

# अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा फोटो









# १०. नाविन्यपूर्ण उपक्रम

## नाविन्यपूर्ण उपक्रम १– सुकर जीवनमान

**Police Application Tracker / अर्ज ट्रॅकिंग प्रणाली**

**Website : https://hingoli.districtpolice.in**

हिंगोली पोलिस दलाने नागरीकांचे जीवन सुखरमान करण्यासाठी **Police Application Tracker** / अर्ज ट्रॅकिंग प्रणाली हा नाविन्यपुर्ण उपक्रम सुरू केली आहे. अर्ज ट्रॅकिंग प्रणाली मध्ये हिंगोली पोलिस विभागाकडे सादर किंवा हस्तांतरित केलेल्या अर्जांची स्थिती मॉनिटर करण्यासाठी एक डिजिटल मंच उपलब्ध करून देते. (उदा. पेट्रोल पंप, अग्निशस्त्र, दारू दुकान परवाना, चरित्र पडताळणी इत्यादी) ही प्रणाली पारदर्शकता सुनिश्चित करते, विलंब कमी करते, आणि नागरिकांचा सहभाग वाढवते.

पुढे..........

# नाविन्यपूर्ण उपक्रम १– सुकर जीवनमान

अर्ज सादर केल्यावर नागरिकांना एक ऑनलाईन अर्ज क्रमांक मिळतो सदर अर्ज क्रमांक वेबसाईटवर टाकल्यास त्याला त्याच्या अर्जाची स्थिती समजते तसेच त्याची स्थिती, प्रगती, आणि अंतिम निकाल याची माहिती मिळते. यामध्ये संबधीत अधिकारी यांचे संपर्क क्रमांक तसेच कार्यालय, पोलीस स्टेशन यांची माहिती उपलब्ध होते. सदर प्रणाली मध्ये **SMS** अलर्ट सुविधा उपलब्ध असून, अर्ज सादर करताच प्राप्ती, प्रगती, आणि अंतिम निकालाचा **SMS** अर्जदाराला दिला जातो. यामुळे तक्रारींचे निराकरण जलद आणि पारदर्शक पद्धतीने होते.

<u>अर्ज ट्रॅकिंग प्रणाली फायदे:</u>

१. नागरिकांना कार्यालयात येण्याचा त्रास वाचतो.


२. घरबसल्या अर्जाची स्तिथी समजते.

३. प्रशासकीय भार आणि कागदी काम कमी होते.

४. अर्जदारांना एसएमएस अलर्टची सुविधा.

५. अधिक पारदर्शकतेसाठी अर्जाच्या स्थितीला सार्वजनिक प्रवेश.

# Police Application Tracker / अर्ज ट्रॅकिंग प्रणाली फोटो



# १०. नाविन्यपूर्ण उपक्रम

## नाविन्यपूर्ण उपक्रम २– कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

**केंद्रीय मुददेमाल व्यवस्थापन कक्ष / CENTRAL EVIDENCE STORAGE UNIT**

**Website : https://hpmm-in/index.aspx**

हिगोली पोलिस दलाने मुदेमाल व्यवस्थापनासाठी विशेष वेबसाइट विकसित केली आहे. या प्रणालीद्वारे हिंगोली जिल्ह्यातील एकूण १३ पोलिस ठाण्यांचा सर्व मुदेमाल डिजिटल स्वरूपात सुरक्षितरीत्या जमा केला जात आहे . ही वेबसाइट केंद्रीकृत आणि सुरक्षित व्यवस्थापन, पारदर्शकता, आणि जलद न्यायिक प्रक्रियेची हमी देते. डिजिटल नोंदी, ट्रॅकिंग, आणि **QR** कोडद्वारे मुदेमालाची ओळख व व्यवस्थापन सुलभ होते. यामुळे पुरावा सुरक्षित ठेवणे, फेरफार रोखणे, आणि न्यायालयीन प्रक्रियेतील कार्यक्षमता वाढवणे शक्य होते. केंद्रीय मुददेमाल व्यवस्थापन कक्षाची स्थापना जप्त मालमत्ता आणि पुराव्याचे केंद्रीकृत आणि सुरक्षित व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी करण्यात आली आहे.

पुढे.......

# नाविन्यपूर्ण उपक्रम २– कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

केंद्रीय मुददेमाल व्यवस्थापन कक्ष चांगल्या व्यवस्थापनास मदत करते, पुरावा गैरव्यवस्थापनाचा धोका कमी करते आणि न्यायिक प्रक्रियेतील कार्यक्षमता वाढवते. आजपावेतो मुदेमाल व्यवस्थापन कक्ष मध्ये ४२४७ मुद्देमाल ४५१ वाहने व ९९४ दारूबंदी असा एकुण ५६९२ मुददेमाल यांना **QR** कोडे देऊन मुदेमाल व्यवस्थापन कक्षामध्ये जमा करण्यात आला आहे. मुदेमाल व्यवस्थापन कक्ष मध्ये ६११६ मुद्देमालास **QR** कोडे देऊन मुदेमाल व्यवस्थापन कक्षामध्ये जमा करण्याचे नियोजित आहे .

महत्त्वाच्या वैशिष्टये:

१. सुरक्षित आणि केंद्रीकृत मुददेमाल संचयन.

२. योग्य दस्तऐवजीकरण आणि ट्रॅकिंगसाठी डिजिटल नोंदी.

३. जप्त मालाच्या हाताळणीमध्ये अधिक पारदर्शकता.

४. पोलिस ठाणे आणि न्यायालये यांच्यात समन्वय सुधारला जातो.

५. पुराव्यात फेरफार किंवा चोरी होण्यापासून संरक्षण.

६ सीसीटीव्ही देखरेख.

# नाविन्यपूर्ण उपक्रम २– कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

<u>केंद्रिय मुद्देमाल व्यवस्थापन कक्षाचे फायदे:</u>

- सर्व पोलिस ठाण्यांतील एकुण मुद्देमालाचे सत्यापन झाले.
- मुद्देमालाची सद्यस्थिती छायाचित्राद्वारे स्पष्ट झाली.
- प्रत्येक मुद्देमालास QR कोड दिल्यामुळे त्याची संपूर्ण माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाली.
- पोलीस स्टेशन मध्ये मुद्देमालामुळे व्यापली गेलेली जागा आता पोलिस ठाण्याच्या इतर कामांसाठी उपलब्ध झाली आहे.
- पोलिस ठाण्याच्या आवारात पडून असलेली वाहने केंद्रिय मुद्देमाल कक्षामुळे पोलिस ठाणे अधिक सुस्थित व स्वच्छ दिसू लागले.
- संपूर्ण जिल्ह्याचा मुद्देमाल एकाच कक्षात उपलब्ध झाल्यामुळे मुद्देमाल गहाळ होण्याची शक्यता कमी झाली.
- केंद्रिय मुद्देमाल कक्षामध्ये सिसिटिव्ही कॅमेरा सर्वेलन्स असल्याने मुददेमालची सुरक्षा होणार आहे.

# केंद्रीय मुददेमाल कक्ष फोटो









# केंद्रीय मुद्देमाल कक्ष फोटो







# केद्रीय मुददेमाल कक्ष फोटो





# केंद्रीय मुद्देमाल कक्ष फोटो



CCTV Surveillance



धन्यवाद